# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-३७** **दिनांक - ०७/०२/२०२४**

## खुनाच्या गुन्हयातील आरोपींना ०६ तासांचे आत अटक करण्यात नवघर पोलीसांना यश

नवघर पोलीस ठाणे येथे दि.०५/०२/२०२४ रोजी प्रथम खबर देणार यांना दि.०५/०२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. चे सु. साधुराम हॉटेल, भाजीमार्केट जवळ, बी.पी. क्रॉस रोड, भाईदर पूर्व, ता.जि. ठाणे या ठिकाणा जवळील सार्वजनिक शौचालयामध्ये एक अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे- ३० ते ३५ वर्षे वयोगटातील अनोळखी पुरुष जातीचा इसम यास कोणीतरी अज्ञात इसमांनी जिवेठार मारण्याच्या उद्देशाने त्यास जबर दुखापत करुन मरणासन्न अवस्थेत टाकुन दिल्याचे पाहिले असता, त्यांनी समक्ष नवघर पोलीस ठाणे येथे हजर होवुन दिलेल्या खबरी वरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. I ९९/२०२४ भा.दं.वि.सं.कलम - ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला होता.

सदर गन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाने गुन्हयाचा गतीमान पध्दतीने तपास सुरु करुन गुन्हयाचे घटनास्थळावरील तसेच घटनास्थळाचे आजुबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तसेच परिसरातील गुप्त बातमीदारांचे सहाय्याने व तांत्रिक विश्लेषणाचे मदतीने आरोपी यांचा शोध घेवुन गुन्हयात एकुण ०४ आरोपीत यांना नवघर पोलीस ठाण्याचे पोलीसांनी ६ तासाचे आत अटक करुन गुन्हा उघडकीस आनला आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा-व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.बजरंग देसाई, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, स.पो.नि. संदिप पालवे, सकुंडे, पो.उप.निरी. धनंजय गर्जेश, ज्ञानेश्वर आसबे, पो.हवा. भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, पो.अं. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, मुकेश निकम, विनोद जाधव तसेच म.सु.ब.कुणाल हिवाळे यांनी केलेली आहे.